
मृदुला पाटील

# चौकस भटकंती



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# चौकस भटकंती

(प्रवासवर्णन)

लेखक : मृदुला पाटील

# चौकस भटकंती

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# चौकस भटकंती

लेखिका : मृदुला भरत पाटील

पत्ता – अक्षर कॉलनी रस्ता क्र ९, मु.पो. – इस्लामपुर, ता- वाळवा, जि- सांगली

मोबाईल – ७०३८४००३१८

इमेल – mrudumugdha@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ एप्रिल २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखिकेचा परिचय

नाव - मृदुला भरत पाटील

शिक्षण - एम बी ए (एच आर), डी. एल. एल.,

नोकरी - व्यवस्थापक (मासं), महावितरण, मंडल कार्यालय धुळे.

घरचा पत्ता – अक्षर कालनी रस्ता क्र ९, मु.पो. – इस्लामपुर, ता-वाळवा, जि- सांगली.

मोबाइल क्रमांक – ७०३८४००३१८

ई मेल पत्ता – mrudumugdha@gmail.com

ब्लाग –fulora

https://mrudaghandha.blogspot.com/2019/03/blog-post.html

आवड – वाचन, लेखन, ट्रेकिंग, नृत्य इ.



जत हायस्कुल, जत. या शाळेने दिलेल्या वाचनाच्या बाळकडूने बालवयापासुनच वाचनाची आवड लागली. व्यक्तीवर्णन, प्रवासवर्णन, कादंबरी,आत्मचरित्रात्मक, ऐतिहासिक, मानसशास्त्रीय तसेच वैचारिक लेखन वाचनाची आवड. पु.ल. देशपांडे, व. पु काळे., वि. स. वाळिंबे, आयन रॅंड, जी. बी. देगलुरकर, प्र.के. घाणेकर, निनाद बेडेकर, शंकर पाटील इ. लेखकांचे पुस्तकांचे वाचनाने प्रभावित केले. यातून शोधण्याची वृत्ती निर्माण झाली आहे. ट्रेकिंगची व इतिहासाची आवड , निसर्गाची ओढ असल्याने समोरच्या ठिकाणाकडे शोधकतेने पाहण्याची सवय यामुळे नव्याने लेखनाची प्रेरणा मिळाली. त्यातून दै. सकाळ., दै. पुढारी तसेच विविध मासिकांनी दिलेल्या संधीतून मानसशास्त्रीय विवेचनात्मक तसेच गडकोटांवर लिखाण घडले. मी सध्या फ़ुलोरा हा ब्लाग लिहीते. आपले छंद आपणास दिवसागणिक समृद्ध करतात या समृद्धीच्या वाटेवरची वाटसरु होऊन चालणे मनस्वी आवडते. भविष्यात मानसिक जडणघडणेवर आधारित लिखाण घेऊन येईन. सध्या मी एका वर्तमानपत्राकरिता असे लेखन करत आहे.

**मनोगत**

आजकाल पर्यटनाची आवड जनमाणसात रुजत आहे, ट्रेकिंग करणाऱ्यांची ही संख्या वाढत आहे ही निश्चीतच गौरवाची बाब आहे. त्यामुळे समाजात आरोग्य विषयी तसेच इतिहासाविषयी आवड निर्माण होऊन लोकांकडुन इतिहासाचा मागोवा घेतला जात असून त्यामुळे संशोधनवृत्ती वाढून खरा इतिहास प्रकाशात येत आहे. तसेच या भटकंतीचा अप्रत्यक्ष फ़ायदा आरोग्यास होत आहे. माणूस त्यामुळे पुन्हा एकदा निसर्गाशी जोडला जात आहे.

अशाच फ़ारशा प्रकाशित तथा ज्ञात नसणाऱ्या अनवट ठिकाणांचा मागोवा घेण्याचा प्रामाणीक प्रयत्न आमच्या ट्रेकिंग ग्रुपनी केला. महाराष्टास लेण्या, गडकोट तसेच सुंदर मंदिरांचे निसर्गाचे अप्रतिम वैभव लाभले आहे. यातील कोल्हापुर, सांगली तसेच सातारा जिल्ह्यातील काही ठिकाणांची नव्या दृष्टीने माहिती देण्यांचा हा छॊटासा प्रयत्न. आमच्या या चौकस भटकंतीत आम्ही आमच्या परिने घेतलेला धुंडाळा आपल्या समोर ठेवत आहॊत. आमच्या नजरेतून काही सुटले असल्यास वा चुकले असल्यास तसे कळवावे. या ठिकाणांचा मागोवा घेताना काही संदर्भ वापरले आहेत याची माहिती शेवटी दिली आहे. यातील सर्वच ठिकाणे वाहतुकीच्यादृष्टीने सुलभ व भटकंतीचा मनमुराद आनंद देणारी. कोणत्याही ठिकाणास अभ्यासपुर्वक भेट दिल्यास मोठे संचित प्राप्त होते त्यासाठीचा हा प्रपंच. आपणही यांचेकडे चौकस नजरेनी पाहिल्यास आपणास भटकंतीची ठिकाणे आनंदाबरोबर इतिहासात डोकावण्याची संधी देणारी आहेत तरी आपण हे पुस्तक वाचुन येथे जरुर भेट द्याल अशी आशा व्यक्त करते.

तसेच सर्व पर्यटकांना विनंती ऎतिहासिक वा निसर्गरम्य स्थळांना भेटी द्याल तेव्हा त्याचे ऎतिहासिक तसेच नैसर्गिक सौंदर्य आपल्यामुळे धोक्यात येणार नाही याची काळजी घ्यावी. पर्यावरण पुरक पर्यटन हा मंत्र नक्कीच अंगिकारावा, शक्य तेथे पर्यावरण राखण्यास खारीचा वाटा उचलावा ही नम्र विनंती.

**अर्पणपत्रिका.**

त्या सर्व सजीव निर्जीव,

ज्ञात - अज्ञात गुरुंना

ज्यांनी जीवनाकडे पाहण्याची दृष्टी दिली त्यांना

मनस्वी समर्पित.

**अनुक्रमणिका**


- किल्ले वसंतगड
- पळसंबे – बोरबेट
- वैविध्यपुर्ण पिंडींचे पाटेश्वर
- पाणथळीतील पक्षांचे निवासस्थान रामलिंग बेट
- पोहाळे लेणी
- श्री क्षेत्र मल्लिकार्जुन तथा विलासगड
- भिगवण

# किल्ले वसंतगड

कराडपासून आठ किलोमीटरवर किल्ले वसंतगड हा तसा दुर्लक्षित गिरीदुर्ग सह्याद्रीच्या बामणोली रांगेत वसला आहे. दुसरा भोज शिलाहार राजा याने 11 -12 व्या शतकात हा किल्ला बांधला इ स 1659 मध्ये हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी वसंतगडाला स्वराज्यामध्ये सामील करून घेतले. शिवकालीन व पुर्व शिवकालीन इतिहासाचा साक्षीदार हा किल्ला आहे. या गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या तळबीड या गावाने सरसेनापती हंबीरराव मोहिते व रणरागिणी ताराबाई या अमुल्य रत्नांचा ठेवा महाराष्टाला दिला. औरंगजेबाने मराठा साम्राज्यावर चढाई करताना पहिली चढाई याच किल्ल्यावर केली. इ. स. 1700 मध्ये हा किल्ला मुघलांच्या ताब्यात गेला. त्यांनी याचे नाव किली द फ़तेह असे ठेवले. इ. स. 1708 मध्ये मराठ्यांनी हा किल्ला परत स्वराज्यात दाखल करून घेतला. इ.स.1808 मध्ये इंग्रजांनी हा किल्ला ताब्यात घेतला. या गडावर जाण्याकरिता तळबिड, सुपने, वसंतगड या गावातून रस्ते आहेत.



वसंतगड किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे 2950 मीटर उंचीवर आहे, आमचा भटक्यांचा ग्रुप आहे. आम्ही सर्वांनी वसंतगड मार्गाने किल्ल्यावर जायचे ठरविले. पावसाळयाव्यतिरीक्त इतर वेळी आपण गाडीने गडाच्या पायथ्याशी कच्च्या रस्त्याने पोहचू शकतो. पावसाळा असलेने कच्चा रस्ता चिखलमय झाला होता, त्यामुळे गावाच्या शेवटच्या टोकाला गाडी पार्क करून आम्ही गडावर चढाईला सुरुवात केली. रस्त्याच्या कडेला डाव्या बाजुला जाताना ओढा वाहत असून त्यावर बंधारे बांधले असून त्यामध्ये पाणी साचले होते. हा परिसर शालु नेसलेल्या गर्द हिरवाईने नट्लेला होता. गडाच्या पायथ्याशी शांत झुळझुळ वाहणारा ओढा पार करून थोडे अंतर चालून गेल्यावर गडाची चढाई सुरु होते. गडाच्या पायथ्याशी मध्यम झाडी असून डोगंरावर जसे जाऊ तशी झाडी विरळ होते. थोडे अंतरावर आल्यावर आम्ही खिंडीत पोहोचलो.

या गडावर जाण्याच्या मार्गात केशरी रंगातील खुणांद्वारे मार्गिका आखणेत आल्या असल्याने गडाची चढाई सोइस्कर होते. या खिंडीमध्ये तळबिडहून येणारा रस्ता मिळतो खिंडीतून थोडे अंतर चालून गेल्यावर आम्ही किल्ल्याच्या मुख्य दरवाजाजवळ पोहचलो. ब्रिटीशांनी किल्ला ताब्यात घेताना इतर किल्ल्याप्रमाणे या किल्याची अवस्था केली आहे. किल्ल्याच्या अनेक वास्तु ब्रिटीशांनी उध्द्वस्त केल्याने आज मुख्य दरवाजा अस्तित्वात नाही मात्र अवशेषावरून बुरुज व पायऱ्यांवरून त्याच्या भव्यत्वाची व गोमुख बांधणीची प्रचिती येते. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजुस विघ्नविनाशक गणेशाची मुर्ती असून तेथून पायऱ्या चढून वर आल्यानंतर भग्नावस्थेतील अवशेष दिसतात. हा दिवडीचा भाग असावा. वसंतगड किल्ला सर्वसाधारणपणे 120 एकर परिसरात पसरलेला आहे, त्यापैकी 80 एकर जमिनी सुपिक असून पावसाळयामुळे चिकनमातीचा परिसर असल्याने चिखल् झाला होता.

आम्ही उजव्या तटबंदीवरून चालु लागलो. या गडाची संपुर्ण तटबंदी सुस्थितीत आहे. इतर गिरिदुर्गांप्रमाणे तटबंदीखालील कातळ तासून नैसर्गिक भिंत उभारली आहे.



उजव्या तटबंदीपासून जवळ एक बुरुज असून त्याची थोडीफ़ार पडझड झालेली आहे. त्याच्या शेजारी भग्नावशेष असून हा पुरक किल्ला असल्याने तेथे सैन्याची राहण्याची जागा असावी. तटबंदीवर अनेक जंग्या असून त्या विविध उंचीवर असून जंग्यातून गडाच्या आजुबाजुचा संपुर्ण परिसत टप्प्यात येतो. या बुरुजाशेजारी शोचकुप आहे. या गडावर तटबंदी व बुरुजांवर झाडेझुडपे वाढली असून त्यामुळे त्याचे अस्तित्वास धोका निर्माण झाला आहे. येथून पुढे गेल्यावर दक्षिणेच्या बुरुजाजवळ पोहचलो. येथून आम्ही खाली पायथ्याकडे जाणाऱ्या टेकडीवर पायवाटेने गड उतरून बुरुजाखालील एका गुहेजवळ पोहोचलो. या गुहेची उंची पावणे दोन फ़ुटांपर्यंत असून रुंदी फ़ारच कमी आहे. एकावेळी गुहेत एकच व्यक्ती जाऊ शकते. या गुहेची लांबी वीस फ़ुटांपर्यंत असून शेवटच्या टोकाला विहीरसादृश्य रचना बाहेरून दिसली.

आम्ही पावसाने चिखल व वटवाघुळांचा रहिवास असल्याने दुर्गधींमुळे शेवटच्या टोकापर्यंत जाऊ शकलो नाही. कदाचित ही गडावर जाण्याची चोरवाट किंवा चकवा असण्याची शक्यता असावी. गुहा पाहून आम्ही पुन्हा गडावर गेलो. तेथून पश्चिम बुरुजाकडे कुच केली. गडाच्या मध्यावर एक मंदिर असून ही त्याची मागील बाजु असून तेथे कृष्णा जलाशय लागतो. गडाला पाणी पुरवठा करणाऱ्या दोन महत्वाच्या जलाशयापैकी एक सुंदर जलाशय पाण्याने काठोकाठ भरला होता. पश्चिम बुरुजाजवळ किल्ल्याचे दुसरे प्रवेशद्वार आहे. हा किल्ला जरी भोज राजाने बांधला असला, तरी संरक्षणाच्या दृष्टीने त्या त्या काळानुसार त्याचे रचनेत बदल केले



गेले त्यानुसार या दरवाजाच्या बाजुचे बुरुज बाहेरील बाजुस दरवाजा सहज दृष्टीक्षेपात येणार नाही असे बांधले आहे. हे काम शिवकालिन असल्याचे त्याचे रचनेवरून दिसते. या दरवाजाचे चौकटीचे बाहेरील बाजुस डोक्यावर शेपुट असणारी लढाऊ वीर हनुमानाची मुर्ती आहे. याही बुरुजाशेजारी दिवडीचे अवशेष असून त्याच्या समोर भिंतीचे अवशेष आहेत. त्याच्या रचनेवरून ती सदर असावी. तेथून पुढे आम्ही शेवटच्या बुरुजाकडे निघालो. तटबंदीवरून जाताना ठिकठिकाणी मशाल ठेवण्याच्या खोबण्या आहेत.



तेथून पुढे गेल्यावर कोयना तळे लागले हेही स्वच्छ पाण्याने भरून गेले आहे. या दोन्ही तळयांमुळे गडावर वर्षभर मुबलक पाणी उपलब्ध होते. गडाने हिरवा पोपटी शालु ल्यायला होता. उत्तरेच्या बुरुजावरून गडाचे व आजुबाजुच्या परिसराचे कोयनापात्राचे विहंगम दृश्य दिसत होते; ते डोळयात साठवून आम्ही गडाच्या मध्यावरील चंद्रसेन महाराजांच्या मंदिराकडे प्रस्थान केले, हे मंदिर गडावरील मध्यभागी थोड्या उंची वर असल्याचे जाणवते. मंदिरात जाण्यापुर्वी त्याच्या शेजारी वेगवेगळे अवषेश असून त्याची भौगोलिक स्थिती पाहता तो बालेकिल्ला असावा. बालेकिल्ल्याच्या शेजारी एका मंदिरात गजलक्ष्मीचे सुंदर शिल्प असून त्या मुर्तीवर खालील बाजुस शिवलिंग पुजेचे शिल्प कोरले आहे. या मंदिराच्या उजवेकडे राममंदिर व डावीकडे विठ्ठल मंदिर आहे. येथून पुढे एका कमानीमधून आत गेल्यावर हेमाडपंथी पध्द्तीचे चंद्रसेन महाराजांचे मंदिर लागते. मंदिराच्या मंडपात दोन नंदी आहेत त्याच्या मागील बाजुस वर्तुळाकार तीन पदरी कमळकाकृती आहे. स्वर्गमंडपात एका घोड्याचे व इतर मुर्त्या आहेत.

गर्भगृहात चंद्रसेन महाराजांची मुर्ती असून डावीकडे जोगेश्वरीची व उजवीकडे जनाईची मुर्ति आहे. जनाईच्या हातात सर्प धारण केला आहे. समोर दिपमाळे शेजारी शेषाशायी विष्णु, वीरगळ तसेच हत्तीच्या मुर्ती असून त्या मुर्ती गडाच्या प्रवेशद्वारावरील हत्ती असावेत .गडावर फ़िरताना विविध वास्तुंचे अवषेश इतरत्र पडलेले दिसतात. एकेठिकाणी चुन्याच्या घाण्याचे अवशेष ही आहेत.

चंद्रसेन महाराजांसोबत अशी कथा सांगितले जाते कि ते महाराज हे शुर्पनखेचे पुत्र असून शंकराचे कठोर निश्चल भक्त होते. त्याच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन शंकराने त्यांना खडग दिले. राम लक्ष्मण जेव्हा या पर्वतावर आले त्यांना ते पाहून आश्चर्य वाटले. त्याचा वापर बांबुचे बेट तोडण्यासाठी केला. त्यातून रक्त वाहु लागले. एक योगी तपश्चर्या करत होता. त्याचे हात पाय तुटून रक्त वाहत होते. पण त्याने तपश्चर्या भंग केला नाही. यानंतर शुर्पनकेने बदला घ्यायचा ठरवला. पुढची कथा आपणास ज्ञात आहे.

या किल्ल्यावर सेवानिवृत्त सैनिक राहत असून त्यांचेकडे आपल्या जेवणाची व्यवस्था होऊ शकते. या गडाचे सोंदर्य डोळयात साठवून आम्ही गडाचा दुपारी चार वाजता निरोप घेतला.

गडावर फ़िरत असताना मुनियां अन्न टिपताना दिसल्या. किल्ल्याकडे येताना जंगली मैना ओढ्याच्या कडेवरच्या झाडावर बसल्या होत्या. तटबंदीवरून फ़िरताना दयाळ चिरीक उडताना दिसतो. बुरुजावर खाटीक पाठशिवणीचा खेळ खेळत होता. कृष्णा तळयात प्लवा बदकांची एकांतप्रिय जोडी निसर्गाच्या कुशीत प्रेमरंगात रंगली होती, जुन ते सप्टेंबर हा विणीचा हंगाम अवशेषात दगडांचे अस्तित्व यामुळे फ़िरताना टिटव्या रक्षणकर्तीच्या भुमिकेत दिसल्या. निरव शांततेत सुमधुर आवाजात रुंजी घालणारा चंडोल मनाला आनंद देत होता. अशा सुंदर निसर्गाने नटलेल्या एतिहासिक वारशाला नक्कीच भेट द्या.

# पळसंबे – बोरबेट इतिहास पाऊलखुणा

कोल्हापुर ते गगनबावडा रोडवरील आसळाज गावापासून तीन ते चार किलोमीटर डावीकडील बाजुस गेलेनंतर सह्याद्रीच्या कुशीत गर्द वनराईत लपलेल्या ओढ्याचा नाद आपल्याला आकर्षित करतो. रस्त्यावरून खाली उतरून गेल्यानंतर आपले डोळे दिपवणारी वनराई, स्वच्छ निर्मळ शांत वाहणार निरभ्र पाणी आणि समोर दिसतात ती हिनयान पंथीय छोट्या पण टुमदार लेण्या पळसंबे येथील ओढ्याच्या पात्रात पहुडलेल्या आहेत.

सध्याचे लेण्याचे ठिकाण हे प्राचीन तात्कालिन व्यापारी महामार्गाचा हा भाग असावा. या सर्व लेण्या जांभ्या दगडात कोरल्या आहेत. या लेण्या ओढ्याच्या पात्राच्या वरील बाजुस असाव्यात परंतु कालाप्रमाणे पात्राशेजारील दग़डांचे सख्खलन होऊन ही लेणी पात्रात आली असावी. या लेण्यांमध्ये अर्धउठावातील स्तुप दिसून येतात. या खडकांमधील तावदानांमध्ये अंड व वेदिका असणारे अर्धउठाव स्तुप सर्वत्र आढळतात. या प्रवाहाच्या वरीलबाजुस छोटे चैत्यगृह व विहार आढळतो. या चैत्यगृहावरील छतावर इतर चैत्यगृहांची अर्धउठावातील प्रतिकृती (स्तुप व जाळीदार खिडक्या)आहेत. विहार व चैत्यगृहातील छत व तुळया आजही जुन्या वास्तुशिल्पाची प्रचिती देतात. विहारातील प्रकाशयोजना अतिशय नेटकी असून चारही बाजुस दरवाजे असून स्वच्छ व शांत सुर्यप्रकाश येथे नियमीत प्रकाशीत करतो. सकाळ असो वा दुपार इथला प्रकाश नियमीतच असतो, तो प्रखर ही नसतो किंवा कमी ही नसतो. विहारात तसेच चैत्यगृह येथे पावसाचे पाणी आत येऊ नये, याकरिता प्रत्येक दरवाजा समोर खांबांची रचना आहे. येथील लेण्याचे छत गजपृष्ठाकार असून त्यामुळे पावसाळयात छतावरून वाहणारे पाणी सहज वाहून जाते; त्यामुळे पाण्याचा प्रवाह बोथट होऊन वास्तुची कमी प्रमाणात हानी होते.

येथे ठिकठिकाणी पोडी (पाण्याचे कुंड) दिसतात. लेणी कोरत असताना खडकातील पाण्याची पातळी समतल राहून नियमीत स्वच्छ पाण्याचा पुरवठा होणेच्या दृष्टीने या पोडी दिसून येतात. काही पोडी या विहाराच्या आजुबाजुच्या खडकात दिसतात यावरून हे खडक पुर्वी एकसंघ होते, नंतर विभक्त झाल्याचे दिसतात.


पळसंबे येथून काही अंतर गेल्यानंतर बोरबेट गावाच्या टोकाशी असणाऱ्या डोंगरावर चढाई करून वर गेल्यास आपण बोरबेट पठारावर पोहोचतो. या पठारावर हिनयान पद्धतीची

लेणी आहे सध्या येथे मोरजाई देवीचे मंदीर आहे. येथे अनेक वीरगळी, सती शिळा आहेत.या लेण्यापर्यंत पठारावरून जात असता तीन दग़डी चौकटी लागतात, येथे दरवाजा किंवा तटबंदीचे अवशेष अस्तित्वात नाहीत मात्र या चौकटी मात्र दिमाखात उभ्या आहेत. लेण्याच्या प्रवेशद्वाराजवळ दिपमाळ तसेच दगडी समाध्या इतिहासाचे साक्षीदार उन वारा सहन करत उभी आहेत. येथे अनेक दगड अस्ताव्यस्त पसरले आहेत. त्यावरून ते तटबंदीचे दगड असावेत असे निदर्शनास येते. सध्या येथे पाण्याची कोणतीही व्यवस्था नाही तसेच पोडी आढळत नाही. त्यामुळे सोबत जाताना पिण्याचे पाण्याची व्यवस्था करावी. सध्या या लेण्याच्या दर्शनी भागात पडझड झाल्याने दगडी बांधकाम केलेले असल्याचे बाजुचे कातळावरून दिसून येते.

इ. स. पुर्व दुसऱ्या शतकात सातवाहन काळात बौद्ध भिक्खु, सार्थवाहक यांनी स्थानिक आदिवासीचे (स्थानिक लोकांचे) नागरीकरणाचे प्रयत्न केले. व्यापारीदृष्टीने त्यांना ज्ञान दिलेः पळसंबा हे पळस व आंब्यापासून रेशमी कापडाकरिता केशरी रंग बनविण्याचे व निर्यात करण्याची शक्यता वर्तवण्यात येते. त्या अनुशंगाने पळसंबे कदाचित चिंतनाचे व बोरबेट हे व्यापारी ठिकाण असण्याची शक्यता आहे.



या दोन्ही लेण्या कोकणात आढळणाऱ्या इतर लेण्याप्रमाणे कडा ठाणाळे/ पन्हाळे काजी प्रमाणे साधे आहे. हे निर्मनुष्य ठिकाण मनाला शांतता प्रदान करते तसेच हिनयान इतिहासात आपल्याला डोकावयाला लावते. अशा या अनवट वाटांना चौकस नजरेनी भेट द्या आनंद व माहिती दोन्हींची शिदोरी आपल्याला मिळेल.




# वैविध्यपुर्ण पिंडींचे पाटेश्वर

बरेच दिवस सहलीला जायचा घाट घातला जात होता ठिकाण ठरत नव्हत. धोकादायक, फ़ार दुरच, गर्दी-गोंगाट असणार ठिकाण असु नये अशा अटी पुर्ण करणारे ठिकाण. जवळ असणारे - शांत निर्धोक असणारे ठिकाण शोधताना दै. सकाळ मधील भटकंती सदरात वाचलेले अनवट ठिकाण पाटेश्वर चमकुन गेल नि ते पक्क केल. आमच्या पैकी कोणीही पाटेश्वर ला यापुर्वी गेल नव्हत. विजया दशमीचा दुसरा अर्थात एकादशीचा दिवस आम्ही इस्लामपुरहून सकाळी साडे सहा वाजता निघालो संपुर्ण नवरात्रीत पावसाने हजेरी लावली होती, मात्र त्यादिवशी रस्ता धुक्यात न्हाऊन गेला होता. आजुबाजुची गावे झाडे धुक्यात गडप झाली होती. सातारा MIDC पासून देगाव रस्ता पाहून आपण चुकीचे ठिकाण निवडले नाही ना अशी शंकेची पाल चुकचुकली.

थोड्याच वेळात आम्ही देगाव ला पोहोचलो. तेथून पाटेश्वरचा रस्ता गावात विचारून पुढे निघालो.नुकत्याच पडुन गेलेल्या पावसाने सह्याद्रीची कुशी हिरवीगार केली होती. बाजुचे तलाव बंधारे पाण्याने ओसंडुन वाहत होते. मोरांचे आरव अशा प्रसन्न वातावरणात आमचे स्वागत करत होते.देगाव पासून हे ठिकाण तसही दुर नि शांत होत. डोंगरावर जिथे रस्ता संपतो तेथे गाडी पार्क करून आम्ही पाटेश्वर मंदिराकडे कुच केली थोडे अंतर चालून गेल्यानंतर पायऱ्या लागल्या. तिथेच समोर केशरी रंगाने रंगवलेली श्रींची रिध्दी सिध्दी सह मुर्ती होती त्यांचे दर्शन घेऊन पुढे जाऊ लागलो. वाटेत वेगवेगळी फ़ुलपाखरे विहार करत होती. हिरव्यागार गवतात सुंदर चकाकी असणारी निळाईने नटलेली निलांबरीची फ़ुले आकर्षित करीत होती. आम्ही त्यांचे फ़ोटो घेतले त्याबरोबर vegna नि सोनकीने परिसर नटला होता जसे एखाद्या कार्यक्रमात नववधु साज करते तसा निसर्गाने साज चढवला होता.. मध्येच हिरव्या झाडीत लांब शेपुट व लांब चोच असणारा पक्षी उडताना दिसला त्याला जवळुन पाहण्याचा प्रयत्न मात्र अयशस्वी झाला. अशी निसर्गाची मनसोक्त उधळण पाहत दरमजल करत सुमारे एक ते दिड कि. मी. चालून आल्यावर एका सुंदर पाण्याच्या बांधीव तलावाशेजारी (पुष्करणी) आलो. तलावात सुंदर कमळांची फ़ुले फ़ुलली होती. इतक्यात अमिता घोरपड घोरपड म्हणुन ओरडली पण दगड नि घोरपड यांच्या एकाच रंगाने ती ओळखु येत नव्हती. या तलावासमोर एक मठ आहे. तसेच तलावामध्ये दुर्मिळ अजएकपाद शिवमुर्ती आहे.

मठाच्या बाजुने थोडे वर चढून गेल्यानंतर आपण पाटेश्वर मंदीराच्या प्रांगणात पोहोचतो. मठाजवळुन जातानाच कोपऱ्यात एकमुखी लिंगावर 57 अयोनिज लिंग असलेले व 65 सयोनिज (शाळूंखा असलेले) लिंगाचे शिवलिंग़ पाहूनच आपणास आश्चर्याचा पहिला धक्का बसतो. पायऱ्या चढून वर गेल्यानंतर मंदीराच्या बाहेरील बाजुस मोठे शिवलींग आहे.बाजुला हनुमान विठ्ठल रुक्मीणी मंदीर आहे. तसेच गरूड, त्याच्या शेजारी पिंड श्री यंत्र पाच शाळुंख्याची पिंड आहे. ग्रथून थोडे पुढे गेल्यास मरगळ लेणी आहे हे एक शिवलिंग त्यावरील म्हैशीच्या शिल्पामुळे वैशिष्ट्यपुर्ण आहे हेच मरगळ लिंग. तेथून मागे येऊन मंदिराच्या आतील प्रांगणात आल्यानंतर पाटेश्वर मंदिर पंचायतन पदधतीचे मंदीर आहे. मुख्य मंदिर जिर्ण झालेले असून हे यादवकालीन बांधकाम वाटते. शिखर घुमटाची रचना अष्टकोनी आहे मुख्य मंदिरात शिवलिंगाबरोबर शेषाशयी विष्णु, महिषासुरमर्दीनीची मुर्ती आहे. मंदीरा समोरचा नंदीची रेखीव सुबक मुर्ती आहे. त्यासमोर शाळुंख्या असून त्यासमोर शिव पार्वती लग्नाचे शिल्प आहे. मंदिराच्या बाजुला चतुर्मुखी शंकर, भवानी, चंडिकेची मुर्ती आहे.



मुख्य मंदिरापासून पुर्वेस काही अंतरावर दोन लेणी समुह आहेत. सुरुवातीस आपणास लागतो पाच लेण्यांचा बळीभद्र लेणी समुह. यातील एका शिवपिंडीच्या बाजुने चक्र, बदाम, गोल इ. दहा आकृत्या कोरल्या आहेत ते दिक्पाल शिवलींग.त्या आठ दिशा व सुर्य- चंद्राचे प्रतिक मानतात. यातील एका लेण्यात अग्नी-वृषाची मुर्ती मानव व बैल रुपातील मुर्ती असून शेजारी सप्तमातृका आपल्या वाहनांसह आहेत मात्र त्या जिर्ण अवस्थेत आहेत, त्याच्याबरोबरीने कार्तिकेय, चामुंडा, नवग्रह यांच्याही मुर्ती आहेत. येथे अजुन चार लेणी आहेत त्यामध्ये सुबक शिवलींग असून शाळुख्यांची उंची साधारण चार फ़ुट इतकी आहे. यातील तीन लेण्यामध्ये पाणी असल्याने आम्ही एकाच लेण्यात आत जाऊ शकलो; याही शिवपिंडीच्या रचनेत वैविध्य आढळते.लेण्यांमध्ये वैविध्यपुर्ण पिंडी असून रचनेबाबत त्या वेगवेगळया आहेत. अशी लोककथा सांगितली जाते कि येथे हजारो देव राहत होते.भक्त त्यांचेकरिता तांदुळ आणावयास गेला परंतु तो आला नाही. म्हणुन इथल्या मुर्ती एका हातात मागणी करणाऱ्या दिसतात.

तेथून थोड्या अंतरावर व-हाड्घर हा तीन लेण्यांचा समुह आहे. हा लेणी समुह तटांनी बदिस्त असून प्रवेशव्दारातच सुबक साखळयांनी लपेटलेला नंदी आहे. तिथे सुबक सुंदर त्रिमुखी, दोन कुंभ असणारे शिवलिंग.,अष्ट्पाक पिंडी तसेच भिंतीवरही शिल्पपटावर सहस्त्र पिंडी आहेत. येथेही विविध पिंडी आहेत अशी दंतकथा आहे कि येथून व-हाड गायब झाल म्हणून याचे नाव व-हाडघर या मुख्य लेणीतील पिंडीवर 1005 अयोनी शिवलींग आहेत.( जे शिवलिंग फ़क्त शाळूंखीच असते) हेच ते सहस्त्रलिंग. पुर्वेच्या भिंतीवर पार्वतीची मुर्ती असून 972 शिवलिंगे असून ती देवीची 108 शक्तीपीठे व त्यांची 9 वेळा पुजा करण्याचा प्रघात दर्शवितात. दक्षिणेकडील भिंतीवर शिल्पपटावर विष्णूची मुर्ती व पश्चिमेस सुर्याची मुर्ती या दोन्हीठिकाणी 1000 शिवलींग असून ती विष्णुसहस्त्रनाम व सुर्यसहस्त्रनामाचे प्रतिक आहे. शिवाय येथे शिवदंड तसेच काळसर्प असून त्या शिल्पपटांवरही 1000 शिवलींग आहेत.या लेण्यात शिव तसेच ब्रम्हाची मुर्ती आहे. येथे एक

शिलालेख आहे, मात्र तो अस्पष्ट असल्याने वाचता येत नाही.शेजारील लेण्यात विविध शिवलिंग खेचुन भरल्या सारखी असून ती यातील बहुसंख्य शिवलींग अयोनिज तसेच काही शिवलिंगावर शाळूंखा एवजी खड्डे आहेत.उजवी गुहा अंधकारमय असून ती आत जाणारी आहे तीत कमळ असणारे शिवलिंग तसेच अयोनिज लिंग धारण केलेली शिवलिंगे पहावयास मिळतात.



एकुणच हे नाथपंथीय लेणी असून गोरक्षनाथ जेव्हा नाथपंथाच्या प्रसाराकरिता 32 शिराळा परिसरात आले, त्याकाळात याचीही उभारणी झाली असावी. येथील मुर्तीचीं रचना पाहता 108 वेळा जपाशी त्याचा संबंध आहे. अशाच प्रकारच्या मुर्ती कंबोडीयामध्ये आढळुन आल्या असून त्याही नाथपंथीय ११-१२ व्या शतकातील आहेत. असा इतिहासाचा अनमोल ठेवा साताऱ्यापासून अवघ्या 12 कि.मी अंतरावर आहे.

# पाणथळीतील पक्षांचे घर – रामलिंग बेट

इस्लामपुर पासून जवळचा पिकनिक स्पाट म्हटल कि नजरेस येते बहे रामलिंग बेट. इस्लामपुरपासून आठ एक किलोमीटरवर वसलेल कृष्णामाईच्या पात्रातील छोॅट बेट. पावसाळयात पावसाने रौद्ररुप धारण केल्यानंतर हा परिसर पाण्याखाली जातो. पावसाचा जोर कमी झाल्यानंतर सप्टेंबर महिन्याचा कालावधी पर्यटनाकरिता जायला योग्य आहे. अनेक हनुमान उपासक श्रावणात व शनिवारी येथे गर्दी करतात. समर्थ रामदास स्वामींनी स्थापन केलेल्या 11 मारुतींपैकी एक रामलिंग बेट येथे आहे. बेटावर जाण्याकरिता नदीतून बेटापर्यंत जाण्यासाठी एक छोॅटा पुल पार करावा लागतो. पुलावरून जाताना कृष्णेचे विशाल पात्र डोळयात भरते. बाजुचे फ़ेसाळणारे पाणी स्वागत करते, आकाशात अनेक पाणपक्षी विहरत असतात, या विश्वात प्रवेश करताना आपल्यालाही मुक्त झाल्याचा भास होतो. बेटावर काही सामाजिक संस्थेने सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून विविध झाडे लावली आहेत त्यामुळे बेटावर वनराई नटलेली आहे.



बेटावर प्रवेशकेल्यानंतर मध्यावरील उंचवट्यावर यादवकालिन सुंदर शिवालय आहे. त्याच्या पाठीमागील बाजुस हनुमान मंदिर असून त्यातील मुर्ती भव्य दिव्य आहे. त्याच्या बाजुस गणपतीचे मंदिर आहे.या भागातून संपुर्ण बेटाचे दर्शन घडते. तेथून पुढे गेल्यानंतर राम –लक्ष्मण- सीतेचे मंदिर आहे.या मंदिराच्या डाव्या बाजुस उतरून गेल्यानंतर छोटा धबधबा आहे. पावसाळ्यानंतर पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर पाण्यात मनसोक्त डुंबण्याचा आनंद घेता येतो. या भागात पर्यटकांची गर्दी असते.येथे पात्रात बगळे., पाणकावळे दिसतात येथील पात्र प्रवाही आहे.




उजव्या बाजुस नदीचे पात्र थोडे विस्तीर्ण आहे. पात्रात बरेच खडक पाण्यातून डोके वर काढून उभे आहेत. तसेच पाण्याचा प्रवाह तसा कमी आहे त्यामुळे पाणथळ येथे तयार झाली

आहे. येथून शांत लयबद्ध पाणी वाहत असते. तसेच लोकांची गर्दी नसते, त्यामुळे पक्ष्यांच्या दर्दीकरिता येथे खास मेजवानी मिळु शकते. येथे पाण्यात सुर मारणारा पाठ सुकवत बसलेले पाणकावळा, झाडांवर ध्यानस्थ बसलेला खंड्या, आकाशात गिरकी घेत पाण्यात सुर मारणारे दुभंगलेल्या शेपटीचे नदीसुरय मुक्तपणे विहरत असतात. या पात्रात पाकोळय्‌चा गलबलाट सुरु असतो. यांची मातीची घरटी पुलाखाली आहेत. शेवाळात भुरा बगळा किडे टिपताना हमखास दिसतो. आपले बगळे खडक पकडुन पाण्यात डुबके घेत असतात या प्रवाहातील पाणकणसांजवळ टिटवी, पाणकोंबडी, लाजरी दुडुदुडू चालीने अलगद हवाई पद्धतीने चालताना दिसते. मला आकाशात भिरभिरणाऱ्या पाकोळया आणि आकाशात विहरणारे सुरई यांच्या दुभंगलेल्या शेपट्या पाहिल्या कि त्यांच्या उडण्याचा अभ्यास करण्याची निकड वाटते. या खडकांच्या दुनियेत आपण मग्न असताना काळ डोक, बाकदार चोच असलेला पांढरा शराटी दिसतो. या सगळया पक्ष्यांच्या दुनियेत पांढरा राखाडी रंगाचा उंच राखी बगळा पाण्यात एकटाच ध्यानमग्न दिसतो. ज्यावेळी मनाला शांतता, एकाग्रते (CONCENTRATION) ची गरज वाटते तेव्हा मी राखी बगळयाला भेटायला बेटावर असुशीने येते. त्याच हे रुप मला नेहमी प्रेमात पाडत नव्यान.


नोव्हेंबर महिना दुसरा शनिवार सुट्टी असल्याने निवांतपणा अनुभवायला बेटावर गेले नेहमीच्या रस्त्याने न जाता उजव्या बाजुच्या खडकातून चालु लागलो, पात्रातील आतील बाजुच्या एका खडकावर बसून चक्रांग बदकांची पाण्यात विहरणारी शांत जोडी पाहत असताना अचानक समोरच्या खाजणात पिवळी केशरी रंगांच्या बदकांचा थवा पाण्यात विहरताना दिसला असा हा प्रथम परिचय होता चक्रवाक बदकांसोबतचा. आमची चाहुल लागताच काही वेळात तो थवा उडाला. बाजुला पाण्यात टिटवी उभ्या होत्या. तेथेच पांढरा काळी चोच व काळी पाठ असणारा लांब गुलाबी रंगाचा काटकी पाय असणारा शेकाट्या पाण्यात खाद्य शोधत होता, लंबुटांगा पाहिला कि पाय कधिही तुटेल असे वाटते. अशा पक्षांच्या दुनियेत आपण रममाण होतो. दुपारची वेळ होती सुर्य डोक्यावर आला होता, त्यावेळी काळा पांढरा कवड्या खंड्या गिरकी घेत

गेला त्याची गिरकी डोळयांना चकवा देत गेल्यासारखी वाटली. त्याचबरोबर काळया पांढऱ्या रंगाचा पट्टा असणारा हुदहुद, लालबुड्या, चिरीक. मुनिया, शिंजीर तसेच हिवाळयात करडा परीट तसेच तारांवर काळा पांढरा परीट पक्षी शेपटी बडवत उडताना दिसतात अशी पक्ष्यांची मेजवानी अनुभवण्यासाठी रामलिंग बेटावर वेळ काढून भेट द्यायला हवी.

# पोहाळे लेणी

कोल्हापुरला आलेल्या प्रत्येक पर्यट्काचा उद्देश हा ज्याप्रमाणे आई अंबाबाईचे दर्शन हा असतो. त्यानंतर त्याची आपसुक पावले श्री श्रेत्र जोतिबाकडे वळतात. जोतिबा म्हणजेच वाडी रत्नागिरीला आपण वडणगे, कुशिरे मार्गाने जोतिबाकडे जाताना जोतिबाच्या पायथ्याशी पोहाळे गावाच्या माथ्याशी पोहाळे लेणी कोल्हापुर पासून 15 कि.मी. अंतरावर आहेत. रस्तालगतच खाली काही अंतर चालून  गेल्यानंतर डोंगराच्या कुशीत पोहाळे लेण्याचे दर्शन होते.

आपण पोहाळे लेण्याजवळ पोहचतो ही लेणी देखील गजपृष्ठकार असून अलंकृत नाही यामुळे ती हिनयान पंथीय असावी याची ओळख पटते. आपल्या डावीकडे पाण्याची पोडी (कुंड) दिसतात. डोंगरातून वाहत येणारे पाणी साठवण्याची तसेच पाण्याचा निचरा होऊन वास्तु सुस्थितीत राहण्याची ही नेटकी व्यवस्था आहे. येथे वरील बाजुने प्रणाल (पन्हळ) असून तिचे पाणी या पोडींमध्ये येते. लेण्यांमध्ये सुरुवातीस पोडी त्यानंतर आपल्याला तीन गुहा /लेण्या दिसतात. त्यानंतर आपण चैत्यगृहात येतो गाभाऱ्यात स्तुप आहे. त्यासमोर सध्या शंकराची पिंड व समोर नंदी आहे. तथापि मागील स्तुप त्यावरील हर्मिका तुटली आहे मात्र स्तुपाच्या वरील बाजुच्या छतावरून तेथे हर्मिका असावी असे वाटते. नेहमीप्रमाणे याही लेण्याचे ब्राम्हणी लेण्यात संस्करण करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.



त्याच्या बाजुस विहार आहे हा प्रशस्त असून 35*32*9 इतका आहे तो स्तंभावर पेलला आहे. सध्या लेण्यांच्या पुनर्जिवनाचे पुरातन विभागाचे काम सुरु असल्याने आत प्रवेश बंद आहे. यावरील एका स्तंभावर चंद्र, सुर्य, घोडा कोरणेत आला आहे. त्याच्या बाजुस चिंतन मननाची छोटो अनेक दालने आहेत. सध्या लेण्याच्या डाव्या व उजव्या बाजुची बरीच पडझड झाली आहे. या लेण्यांसमोरही पाण्याचा योग्य निचरा करणेकरिताचे छोटे पाट आहेत. लेण्यांतील खिडक्या- दरवाजांची रचना पाहता स्वच्छ, खेळती हवा राहणेच्यादृष्टिने केलेली व्यवस्था आढळते. तसेच पावसाच्या पाण्यापासून संरक्षण होणेकरिता समोरील छत दरवाज्याच्यापुढे असून व्हरांडा आहे, तर दोन्ही बाजुच्या भिंतीना खिडक्या (दालने) असून बाजुचा भाग भिंतींनी पुर्ण बंद आहे. या भागात पडणाऱ्या पावसाच्या पध्दतीचा देखील लेणी खोदताना अभ्यास केला आहे. येथील खडक जांभा असल्यानेच लेण्यांची पडझड झाली आहे. सध्या लेण्यासमोर मध्यावर एक पिंपळाचे झाड आहे. येथे बाराही महिने पाणी उपलब्ध आहे. हे लेणे 7 व्या शतकातील असल्याचे कोल्हापुर जिल्हायाच्या गझेटियरमध्ये म्हटले आहे; परंतु नव्याने झालेल्या संशोधनानुसार हे लेणी मोर्यकालिन असून ही लेणी धार्मिक प्रसाराचे केंद्र होते असे संशोधनातून पुढे आले आहे. आपण अगदी कमी वेळात हे सुरेख लेण पाहु शकता तर जोतिबाला जाताना गाडी या थांब्यावर थोडया वेळाकरिता नक्की थांबवा.



# श्री क्षेत्र मलिक्कार्जुन तथा विलासगड

पुणे- बैंगलोर महामार्गावरील कराड पासून 32 कि.मी अंतरावरील येडेनिपाणी गावापासून आष्टा रोडवर थोडे पुढे गेल्यास अंदाजे दिड कि.मी अंतरावर श्री क्षेत्र मल्लिकार्जुन येडेनिपाणी असा फ़लक आपण पाहतो. तेथून समोरील डोंगरावरील फ़िक्या अबोली रंगाने रंगविलेले मंदिर दिसते.(सध्या रंगवले आहे) आपली गाडी या मंदिराच्या पायथ्यापर्यंत जाते तेथून मंदिरापर्यंत 30 मिनिटात पोहोचतो, हाच तो विलासगड मात्र स्थानिक लोकात येथील सध्या असणाऱ्या मल्लिकार्जुन मंदिरावरून हे ठिकाण मल्लिकार्जुन डोंगर या नावाने प्रसिद्ध आहे.



येथे मंदिरापर्यंत जाण्याकरिता पायऱ्या केल्या आहेत. आपण काही पायऱ्या चढून गेल्यानंतर नव्या पायऱ्या संपुन जुन्या पायऱ्या लागतात व डावीकडे जाणारा रस्ता लागतो. तेथून पायऱ्या सोडुन आपण डावीकडे गेल्यास एक सुंदर खोल पाण्याचे टाके लागते. या टाक्यास खालची गंगा म्हणतात. येथे आपणास जलनियोजनाचे उत्कृष्ट नमुना पहावयास मिळतो पावसाचे पाणी थेट टाक्यात न जाता वेगवेगळ्या खडकाच्या पोडीत साठते व तेथून टाकात जाते. त्यामुळे टाक्यात नितळ पाणी साठते.



त्याच्या बाजुस एका गुहेत शंकराची पिंड त्यासमोर नंदिची मुर्ति आहे. ती पाहून आपण थोडे वर चढून आल्यावर पायऱ्या लागतात तेथून चढून गेल्यास जेथे पायऱ्या संपतात तिथे उजव्या बाजुस दोन कमानी असलेली इमारत लागते हि शिवोत्तर कालिन शैलीत बांधलेली आहे तिच्या उजव्या बाजुस एक टाके आहे. या पायऱ्यांच्या शेजारी पाहिल्यास तटबंदीचे अवशेष आहेत हे यादवकालिन बांधकामाप्रमाणे वाटतात.(step pattern)

तेथून पुढे मंदिराच्या प्रांगणात गेल्यावर डाव्या बाजुस भैरवनाथाचे मंदिर लागते या मंदिरात एका देवीची मुर्ति असून हे एक लेणे असून ते डालिमा देवीचे आहे. त्यापुढे एक ओसरी असून तिथे आत गेल्यास दोन लेणी असून यांची बरीच पडझड झाली आहे. सध्या त्याचा वापर भांडारगृहाकरिता करतात; त्यापुढे मुख्य लेणी असून दर्शनी भाग हा त्याचे वास्तु वैशिष्ट्यांवरून यादवकालिन वाटतो. आत गेल्यावर डाव्या बाजुस कोटीलिंग, सतिशिळा,त्याच्यापुढे शिव पार्वतीची ध्यानस्थ मुर्ति आहे. समोरील बाजुस वीरभद्र लेणी तथा मंदिर असून तेथे पिंड आहे. येथेच डाव्या हातात धनुष्य व उजव्या हातात खडग घेतलेल्या विरभद्राची मुर्ती आहे. या दालनात जाण्याकरिता दरवाजा लहान असून वाकुन जावे लागते. त्याचे दर्शन घेऊन आल्यावर मंडपात

आपणास एक लेणे रिकामे आहे त्याच्या बाजुच्या लेण्यात कार्तिक स्वामीची मुर्ती आहे. त्याच्यासमोर राम सीता.,गंगा.,नागशिळा असून तेथेच गणपतीची सुंदर कातळातील मुर्ति आहे. विरभद्र लेण्यासमोर नंदी आहे. उजव्या बाजुस एक शिवलिंग असून तेच मल्लिकार्जुन त्याच्या समोरिल गुहेत (लेण्यात) वाकडा नंदी असून तेथे सप्तमातृकांचा पट आहे. येथील स्तंभ बाहेरील स्तंभापेक्षा वेगळे असून आकाराने मोठे आहेत तसेच स्तंभशिर्षाशी उलटा कुंभ आहे. मंदिराच्या समोर दोन दिपमाळा आहेत. बाजुस नगारखाना आहे.



तेथून पुढे आल्यास चुन्याचा घाणा दिसतो. घाण्याशेजारी ही पाण्याची पोडी/टाक असून सध्या त्यामध्ये पाणी नाही. या गडावर सध्या कोणताही बुरुज वा तटबंदिचे अवशेष शिल्लक नाहीत. या गडाचा वापर टेहाळणीकरिता करणेकरिता करणेत येत असावा. घाण्यापासून पायऱ्या चढून वर गेल्यानंतर एक मशिद व दर्गा लागतो वरती विठ्ठल रुक्मीणी, कृष्णाचे मंदिर आहे. त्याच्या समोर दोन खंदक असून त्यात उतरणेकरिता पायऱ्यांची योजना आहे ते धान्याचे कोठार असावे. मशीद्च्या बाजुस एक आदिलशाही शैलीतील इमारत दिसते,

तिच्या दोन्ही कमानी व इमारत सुस्थितीत आहे. ती गडावरील सध्या उपलब्ध एकमेव बांधकाम आहे. त्याच्या पुढे एक तळे असून ते घोडतळे म्हणून ओळखतात येथील पाण्याचा वापर घोड्यांना पाणी पिण्याकरिता केला जात असावा. तेथून परत धान्याच्या कोठारापर्यंत आल्यावर तेथून खाली एक वाट जाते थोडे अंतर उजवीकडे उतरून गेल्यावर एक पाण्याचा टाक लागतो. त्यास गंगा म्हणतात हिला स्थानिक वरची गंगा म्हणतात. तेथे उतरणेकरिता दगडी कोरलेल्या पायऱ्यांची सोय आहे. या टाकातील पाणी या लेण्यातील सर्व टाकात स्वच्छ आहे. तेथून पुढे वळसा घालून आलेस पुन्हा समोरील पायऱ्यांपर्यंत पोहचता येते.

विलासगडास असा पुरातन इतिहास असून हे देखील गजपृष्ठाकार मुळचे नाथपंथिय लेणे असावे कारण नाथपंथिय लेण्यांचे स्थापत्यावर बौद्ध लेण्यांचा प्रभाव असून शिव ही नाथपंथीय आराध्य देवता असून या मंदिरात दोन सयोनी शिवलिंग सप्तमातृकापट आढळतो. आजकाल उपलब्ध विज्ञाननिष्ठ पद्धतीने कालगणना केल्यास तिचा प्रकार निश्चीत करता येण सहज शक्य होईल. लेण्याचे पुढे संस्करण होऊन सध्याचे शिव मंदिर अस्तित्वात आले आहे. यादवकालातील गडांचे प्रकारामध्ये गुहांचा गड म्हणून वापर होत असलेने गुहागड हा गडप्रकार आढळतो त्या अनुशंगाने या मंदिरातील समोरिल मंडप हा यादवकाळाची साक्ष देत असल्याने तसेच सध्याचे मंदिराच्या तटासमोरील बाजुस डोंगराच्या कडेस आजही दगडी बांधकाम आहे यावरून ह किल्ला (गुहेचा वापर किल्ला असा) यादवकाळापासून अस्तित्वात असावा. महाशिवरात्री तसेच श्रावणात येथे यात्रा असते भाविक मोठ्या प्रमाणात गर्दी करतात.अशी लेणी-गड अन मंदिर असणारे श्री क्षेत्र मल्लिकार्जुन येडेनिपाणी आपणास साद घालत आहे.

- **संदर्भ**

अंतराळजाळावरील माहिती (विकीपीडीया)

लेणी महाराष्टाची - डा. दाऊद दळवी









# रोहित पक्ष्यांच माहेरघर भिगवण प्रसन्न अनुभव

पक्षीप्रेमींच पुण्यापासून जवळच ठिकाण म्हणुन ओळख आहे ती पुणे – सोलापुर रस्त्यावरील उज्जनी धरणाचे मागील पाणलोट क्षेत्र भिगवण पक्षी अभयारण्याची. हिवाळा सुरु होताच मार्च महिन्याचे अखेरीपर्यंत यापरिसरात लगभग असते शेंदरी गुलाबी लाली ल्यायलेल्या रोहित पक्ष्याचीं व इतर स्थलांतरित पक्षाची त्यांना सोबत असते पक्षी निरीक्षक पर्यटकांची. जवळपास 250 पक्षी या कालखंडात दृष्टीस पडतात. महाराष्टातील महत्वाच्या पक्षी अभयारण्यातील भिगवण तथा कुंभारगाव बारामती जवळील पक्षी अभयारण्य आहे.

कोणत्याही पक्षी निरीक्षणाची वेळ असते ती सकाळी आठ ते दहा व सायंकाळची पाच ते सात अशी सावळी सावळी. सोबत दुर्बिण, डी एस एल आर कमेरा, टायपाड इ साहित्य सोबत घेऊन जाणे दुग्धशर्करा योग घडवून आणतात त्यामुळे शक्य असल्यास या गोष्टी सोबत बाळगाव्यात.

आम्ही भिगवण येथे सकाळी आठ वाजता नावेतून जलाशयात पक्षी निरीक्षणास गेलो. यावेळी आमच्या सोबत आमचा गाईड होता अतुल दादा. शांत समंजस नीट माहिती देणारा नि पक्ष्यांजवळ जाताना नाव हाताने वल्हवत खास ठिकाण शांतपणे दाखवणारा. आपण येथे भेट देणार असाल तर त्याच्या बरोबर जाण्याचा आनंद घ्या. ( दुरध्वनी क्र 9767973020) ज्याप्रमाणे वारकऱ्यांची पंढरी तशी पक्षी प्रेमींची ही भीमाकाठची पंढरी. यातील स्टार आकर्षण म्हणजे दर्दी नि गर्दींची नजर असते ती जवळपास मोराइतक्या आकाराचा लांब मान व पाय असणाऱ्या स्थलांतरित पांढऱ्या शेंदरी गुलाबी रंगाच्या हुक चोचीच्या रोहित तसेच अग्नीपंख हे नाव दिमाखात मिरवणाऱ्या गोड पक्षाकडे. अग्नीपंख पक्षी थव्यानी विहार करतो पाण्यात चालताना हे परेड करत चालतानाचे दृश्य डोळयात भरून घेताना आमचे रितेपण सिद्ध होत होते.

रोहित पक्ष्याच्या परिक्षेत्रात माणसांचा वावर झाल्यास पटकन अनुभवी पक्षी इतरांना सावध करतो नी गुलाबी काळे पंख नि पाच फुट उंचीच्या पक्ष्याची ती सहज झेप आपल्याला श्वास रोखुन धरायला लावते. त्यांच ते शिस्तबद्ध ओळ करून उडण मनाला त्यांचे वेगात सामावून घेत. यावेळी शालेय जीवनातील कवायती परेडची आठवण प्रकर्षाने येत राहिली. भीमेच्या तीरावर यावेळी पाणपक्ष्यांची मांदियाळी होती.

भीमा तटावर खाद्य टिपणारा काळा तपकीरी चकाकी असणारा डोक्यावर शेंदरी





टिपक्यांचा काळा शराटी, काळे डोके मान असणारा बाकदार मानेचा बगळ्याहून मोठ्या आकाराचा पांढरा शराटी निवांत पाण्यात मान वर खाली करताना किंवा नदीचे पाणी कमी झाल्याने उघड्या पडलेल्या गाळमातीवर पांढरा शराटी निवांत फ़िरताना दिसला. शराटी भक्ष्य पकडताना चोचीचा वापर सांडशी सारखा करतो.

येथेच पाण्यात गुलाबी तुरकाटी पायांचा, लांब बारीक तीक्ष्ण चोचीचा शेकाट्या उथळ पाण्यात चालताना पाहून याचा पाय किती नाजुक असा उदगार आलेशिवाय राहत नाही. याचवेळी आ मच्या सोबतच्या लोकांनी आणलेला खाऊ टिपण्यासाठी हिवाळि सुरय पक्ष्यांनी गर्दी केली होती. नावे भोवती फ़ेरा धरला होता शेपटी दुभंगलेला पिवळया चोचीचा नदीसुरय आणी काळया चोचीचा हिवाळी सुरय डोलदार गिरकी घेत अवकाश विहंग करत होते. त्याच्या पाण्यात सुर मारणेच्या पद्धतीने सुरय हे नाव सार्थ होते असे वाटते. गोंगात करत पाण्यात इतक्या सफ़ाईदारपणे सुर मारणे पाहून त्या म्हणीचा अर्थ कळतो.

त्याचप्रमाणे येथे पाणकावळे, चिलखती रंगाचे निवांत पाण्यात लुटुलुटू पोहणारे बदक प्लवा किंवा राखी बदक, थापाट्या, तलवार बदक आजुबाजुच्या खाजणात पिवळी केशरी रंगांच्या बदकांचा थवा पाण्यात विहरताना दिसला असा हा प्रथम परिचय होता चक्रवाक बदकांसोबतचा. आमची चाहुल लागताच काही वेळात ते बदक उडाले.




येथे मोठ्या प्रमाणात दिसतात ती तुरुतुरु धावणारी मानेवर काळा पट्टा असणारे चिखला अगदी चिमणी इतका किंवा थोडा लहानच चणीचा.आणि त्याच कुळीतले स्थलांतरित हिरवा तुतारी नि कवड्या तुतारी. या तुतारींच्या थव्यात सहज वावरणारा पिटुकला चिखल्या अगदी भावतो.

भिगवणला सहज दिसतो तो अडकित्याच्या चोचीचा मुग्धबलाक त्याचे सोबतीला त्याचेपेक्षा मोठा काळा पांढरा गुलाबी पिसे असणारा चित्रबलाक सकाळच्या उन्हात पंख पसरून बसलेला दिसला. त्याचप्रमाणे बगळयांच्या कुटुंबातील माझा प्रिय ध्यानमग्न राखी बगळा खोल पाण्यात आपल्याच विश्वात मश्गुल होता. त्यांच्या सोबतीने काळया पायांचा बगळयापेक्षा मोठा उलतण्यासारखी लाकडी चोच असणारा चमचा शैवाळात रमलेला दिसला. सोबतीला पांढरी

पाणकोंबडी शेपुट आपटणारा पांढरा धोबी यासाऱ्यांची वद्ळ प्रपंच पाहत असताना दुपारची उन्ह परतीची साद घालतात. मनात विचार येतो इतके सारे भिन्नता घेउन असणारे निसर्गाचे दान गुण्यागोविंदाने नांदते तीच विविधतेतील एकता. निसर्गाने प्रत्येकाला एक बलस्थान दिले आहे . याच एकतेसाठी पण माणूस मात्र इतरांच्या बलस्थानांना दुर्लक्षित करून नांदण विसरत चालला आहे.






अशा या पंढरीचे वारकरी नक्की बना .

मित्रहो

## पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात . ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.